प्रेस नोट                     दिनांक ०४/०३/२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग. |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | १०/२०२१, |
| ३ | कलम | कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | १) श्री. मा.या.शंखपाळे, कार्यकारी अभियंता – वर्ग–१<br>२) श्री महेंद्र भानुदास ठाकूर, वय सुमारे ५३ वर्षे, शाखा अभियंता, वर्ग–२<br>३) श्री संतोष अरविंद शिर्के, वय ४७ वर्ष, पद – लघु टंकलेखक, वर्ग–३<br>कार्यालय :– सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय, उत्तर मुंबई. प्रशासकीय इमारत दादाभाई मार्ग, भवन्स कॉलज समोर, अंधेरी पश्चिम मुंबई. |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १,४०,०००/– |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | तक्रार देण्यापुर्वी रू. ५०,०००/– स्विकारलेली असून सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. ३ यांस रू. ९०,०००/– स्विकारताना रंगेहात पकडले |
| ७ | थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी हे सेवानिवृत्त असून सध्या मुलीच्या बांधकाम व्यवसायात कार्यरत आहेत. तक्रारदार यांच्या मुलीने सन २०१५–१६ या वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागासाठी केलेल्या कामाचे अंदाजे रूपये ७ लाखांची बिले सातत्याने पाठपुरावा करूनही यातील आलोसे कडून मंजुर केली जात नव्हती.<br>प्रलंबित बिले पारीत करण्याकरीता यातील आलोसे क्र. २ यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना रू. १,५०,०००/– दिल्यानंतर त्यांचेकडून दोन बिले अंतिम मंजुरीकरीता पाठविण्यात आली. सदर बिलांची पुढील मंजुरी मिळविण्याकरीता तक्रारदार यांनी कार्यालय प्रमुख म्हणून यातील आलोसे क्र. १ यांची भेट घेतली असता, त्यांनी आलोसे क्र. ३ याना भेटण्यास सांगितले. तक्रारदार आलोसे क्र. ३ यांना भेटले असता, त्यांनी आलोसे क्र. १ यांचेशी चर्चा करून बिल मंजुर रक्कमेच्या २० टक्के म्हणजे रू. १,४०,०००/– दिल्याशिवाय तक्रारदारांचे बिले मंजुर होणार नाहीत असे सांगून नमूद रक्कमेची मागणी केली. त्यावेळेस आलोसे क्रमांक ३ यांनी तक्रारदार यांचेकडून रू. ५०,०००/– घेतले व त्यातील एक बिल आलोसे क्र. १ यांचेकडून मंजुर करवून घेतले. बाकी बिल मंजुर करून देण्यासाठी उर्वरीत रक्कम रू. ९०,०००/– ची मागणी केली. तक्रारदार यांना नमुद आलोसेंना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे दिनांक ०३/०३/२०२१ रोजी लेखी तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीस अनुसरून केलेल्या पडताळणीत आलोसे क. ३ यांनी लाचेची मागणी केल्याचे व त्यास आलोसे क्र. २ यांनी याकामी तक्रारदारांना अपप्रेरणा दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक ०४/०३/२०२१ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे क. १ यांनी आलोसे क. ३ यांना लाचेची रक्कम देण्यास सहमती दिली व आलोसे क. ३ यांना त्यांना स्वत:करीता तसेच आलोसे क. १ यांच्याकरीता रू. ९०,०००/– रक्कमेची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले.<br>त्यांनतर आलोसे यांच्या कार्यालयाची झडती घेतली असता आलोसे क्र. ०३ हे जेथे बसतात तेथे त्यांच्या कब्जा व ताब्यात असलेल्या कपाटातुन, त्यांच्या खाजगी बॅगेतुन असे मिळुन एकुण रूपये १३,१५,०००/– एवढी रक्कम मिळून आली.<br>यातील आलोसे क्र. ३ यांनी स्वत:करीता व आलोसे क. १ यांचेकरीता लाचेची रक्कम स्विकारली व आलोसे क. २ यांनी त्यास अपप्रेरणा दिल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

ACP

(विनोद स. कालेकर)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

2021/03/04 21:46